Vol 5 Issue 2 Nov 2015

ISSN No : 2249-894X

## *Monthly Multidisciplinary Research Journal*

# *Review Of Research Journal*

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal
University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra
Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University,
Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science &
Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University,
Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and
Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance
Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College
Commerce and Arts Post Graduate Centre
(BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA
UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate
College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
ISSN 2249-894X

Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 5 | Issue - 2 | Nov - 2015

# एकनाथांच्या विराण्यांतील आशयविश्व आणि काव्यसौंदर्य

एकनाथ सयाजी ढोणे
सहयोगी प्राध्यापक, रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय,
श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

### 1.1 प्रास्ताविक :–

मराठी संतांनी मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये भक्तिमार्गाची स्थापना करून एका नव्या युगाचा प्रारंभ केला. लोकजीवनाला नवे वळण लावण्याच्या हेतूने विविध धर्मपंथ या काळात उदयाला आले. उत्तर आणि पूर्व भारतामध्ये ‘मधुराभक्ती’ नावाचा संप्रदाय या काळात अतिशय लोकप्रिय होता. बंगालमध्ये चैतन्य प्रभूंच्या काळात ही प्रवृत्ती पूर्ण विकास पावली आणि साऱ्या उत्तर/पूर्व भारतात दोन-तीनशे वर्षेपर्यंत या भक्तिविचाराने अधिराज्य प्रस्थापित झाले.

या भक्तिभावाचा एक आविष्कार विराण्यांमधून प्रकट झाला. ‘विराण्या’ हे विराणीचे अनेक वचन. विराणी म्हणजे विरहात राहून परमात्म्याशी मिळू पाहणारी व्यक्ती. म्हणून तिला विरहिणी किंवा विराणी म्हणतात. मराठी संतांनी विरहाच्या व मीलनाच्या अनेक आंतर्गर्भ विराण्या लिहिल्या. जीव परमात्म्याच्या भेटीसाठी किती व्याकुळ होतो. त्याच्या मनाची तडफड कशी होते. त्याच्या जीवाची लाही लाही कशी होते याचे मोठे सुंदर वर्णन विराण्यांतून होते.



हा विरह शेवटी मीलना जवळ संपतो. तो जीवाचा सखा भेटतो आणि मीलनाचा आनंद चारी बाजूंनी उसळून येतो. जीवाशिवातील विरहाचा, आतुरतेचा, मानसिक कष्टाचा, मीलनाच्या सुखाचा आणि पुत्र सुखोपभोगासाठी विरहाचा आनंद मराठी संतांनी अनुभवला आहे.

भक्त आणि परमेश्वर यांच्या विरहातील उत्कटता आणि मीलनाची बेहोषी प्रियकर-प्रेयसी, पती-पत्नी या नात्याच्या रूपाने व्यक्त करणारे गीत म्हणजे विराणी. त्यामागील तात्त्विक भूमिका व इतिहास आता थोडक्यात पाहू.

### 1.2 कांताभाव :–

परमेश्वरावर ‘आत्यंतिक प्रेम’ म्हणजे भक्ती. परंतु आत्यंतिक प्रेम हे भक्तीचे अविभाज्य अंगच मानावयास हवे. ‘मधुराभक्ती’तील भक्तीच्या उत्कटतेचे स्वरूप स्पष्ट करण्यासाठी नारदांनी गोपींच्या प्रेमाचा दृष्टांत दिला आहे. ‘यथा व्रजागोपिकानाम्’ या सूत्रात ते गोपींच्या उत्कट कृष्णप्रेमाचा उल्लेख करतात. गोपींचे कृष्णविषयक प्रेम अत्यंत उत्कट होतेच, पण शिवाय ते सर्वस्वार्पण बुध्दीने केलेले प्रेम होते. गोपी या संसारी स्त्रिया. पण घरदार, पति-पुत्र, सासू-सासरे या सर्वांची आसक्ती सोडून त्या कृष्णावर अनुरक्त झाल्या होत्या. यापासून त्यांना परावृत्त करावे म्हणून कृष्णाने त्यांना उपदेश केला. परंतु गोपींच्या मनावर त्याचा काहीही परिणाम झाला नाही. उलट कृष्णाने आपली निराशा केली. त्यामुळे त्या अत्यंत कष्टी झाल्या. “सर्व विषयांचा त्याग करून आम्ही तुझ्या पायाशी आलो आहोत, अशाप्रकारे आमचा अव्हेर करणे हे भगवंता, योग्य नाही.” असे त्या कळवळून सांगू लागल्या.

गोपिकांच्या शृंगारभक्तीत मधुराभक्तीचा अंश आहे. परंतु शृंगारभक्तीच्या कल्पनेत मधुराभक्तीची कल्पना पूर्णपणे व्यक्त होऊ शकत नाही. मधुराभक्ती ही एका विशिष्ट तात्त्विक सिध्दान्ता वर आधारलेली आहे. गोपींच्या ऐवजी पुरुषभक्त असतील तर त्यांनी कृष्णावर शृंगारिक प्रेम कसे करायचे?

भक्त स्त्री असो अगर पुरुष असो. परमेश्वरा विषयी कांताभाव धारण परमात्म्याची प्रेयशी अथवा पत्नी होणे ही मधुरासक्ती होय. भारतीय मधुराभक्तीचे आद्य आणि प्रमुख केंद्र म्हणजे पूर्व भारत हे होय. येथे प्रथम ही स्त्रीप्रधान उपासना उदयाला आली आणि नंतर वैष्णव भक्तांच्या बरोबर वृंदावन व अन्य प्रदेशात गेली.

महाराष्ट्रात मात्र माधुर्यरतीला स्थान मिळाले नाही. सख्य, दास्य, वात्सल्य आणि शांत या भक्ती प्रकारातच महाराष्ट्र रमला. याचे एक कारण असे दिसते की, बंगाल अगर उत्तर भारतात ज्याप्रमाणे वामाचारप्रधान तंत्राने कामाचाराची पूर्वपिठिका तयार करून ठेविली होती तशी महाराष्ट्रात नव्हती.

आणि शिवाय ज्ञानेश्वरांच्या नवयुग प्रर्वतनाचे वैशिष्ट्याच असे होते की, अनैतिकतेला असामाजिकतेला आणि स्वतंत्र कर्मकांडात्मक भक्तिसाधनेला येथे अवसरच मिळाला नाही.

### *1.3 ज्ञानवैराग्याची बैठक :–*

महाराष्ट्रातील मधुराभक्ती भागवत संप्रदायाच्याच आधाराने विकसित होत गेल्यामुळे तिला गौरवपूर्ण अशी मर्यादा प्राप्त झाली आहे. बहुतेक संतांनी विठोबास माऊली म्हणून आळविले आहे. या माऊलीशी 'शृंगारी' भाव कल्पिताना संतांनी कमालीचे गांभीर्य व मर्यादा राखली आहे. ज्ञानदेव, तुकाराम यांच्या विरहिण्या या दृष्टीने पाहण्यासारख्या आहेत. भाषेत सर्वत्र शृंगारी थाट पण अभंगातील अनुभूती मात्र वैराग्याची वा ज्ञानाची दिसून येते. भक्ती व ज्ञान यांचे अपूर्व मिश्रण येथे दिसते. स्वतःच्या भक्तिसाधनेत वा अनुभूतीच्या प्रकटीकरणात मराठी संतांनी राधेला फारसा वाव दिला नाही. नामदेव–एकनाथांनी वस्तुनिष्ठ दृष्टीने राधा–कृष्णाच्या क्रीडा वर्णन केल्या आहेत हे खरे. पण पुराणांच्या आधारे शृंगारी लोकांना भक्तिमार्गाकडे ओढण्यास हा राधाविलास व गोपीक्रीडा आहे, असा निर्वाळा जागजागी संतांनी दिला आहे. तरी नामदेव, एकनाथ स्वतंत्रपणे विरहिण्यांतून ज्यावेळी आत्मिक अनुभव सांगतात, त्यावेळी शृंगारभक्तीची उदात्तता कायम राहिली आहे. राधा–भाव अंगी बाणवून तसे आचरण नित्याच्या व्यवहारात करण्याची संतांना आवश्यकता वाटली आणि याचाच सामाजिकदृष्ट्याा महत्त्वाचा परिणाम असा झाला की, लोकांपुढील नैतिक आदर्श कधी ढळला नाही. सारे संत वैराग्याचे पुतळे होते. काहींनी प्रपंचातील माधुरी कोणत्या भूमिकेवरून घ्यावी हेही दर्शविले. पण संतांच्या संप्रदायात भक्तीच्या नावाखाली अनाचारास व सामाजिक पतनास कोठे वावच उरला नाही. विरहिण्यांतून ज्ञानवैराग्याची प्रखर ज्योतच तेवत असल्याने तिच्या प्रकाशात नैतिकतेचा महान आदर्श आपल्या स्थानापासून ढळू शकला नाही.

परमेश्वराची भेट होण्यासाठी भक्त काकुळतीला येऊन त्याची विनवणी करीत असतो. त्याची व्याकुळता शब्दाशब्दांतून आपल्या मनाला जाणवते. कधी हा भक्त शुभशकुन दे, आनंदाची बातमी आण असे कावळ्याला विनवून सांगतो, तर कधी तुकारामांसारखा संत 'वाळो जन मज म्हणोत शिंदळी' असा मनोनिर्धार करून संसाराचा त्याग करतो. त्या 'बळियाच्या बळिवंता' होण्याचा ध्यास घेतो. 'जलविण मासा जैसा तळमळी' अशी बहिणाबाईंची अवस्था होते तर त्या काळ्याा कृष्णाचा वेध लागलेले एकनाथ त्या कृष्णरंगात रंगून जातात. या 'आर्त' भक्तीची भाववृत्ती त्यांच्या शब्दांतून व्यक्त होते. ते परमेश्वराचा धावा करतात, टाहो फोडतात, प्रेमळ ठपका देतात. व्याकुळ विनवण्या करतात. केव्हा तो पाशात अडकलेल्या पाडसासारखा तडफडतो, तर कधी चातकाची, मोराची भूमिका घेतो. अनेक वेळा तो कृष्णविरहिणी गोपी होतो आणि विरहीजनांचे दुःख अनुभवतो. अशा प्रकारच्या अनेक भूमिकांपैकी प्रेयसी–प्रियकराच्या नात्यातील विराण्या अधिक प्रसिध्द पावलेल्या दिसतात. याचे कारण 'मधुराभक्ती' या संप्रदायाचा प्रभाव हे होय.

वैष्णव संप्रदायी भक्तीने महाराष्ट्रात जरी मूळचे अतिशय सोज्वळ भागवतपंथी रूप टिकवून धरले होते, तरीही राधारतीची व विरहाची रूपके या काव्यातून आली आहेतच. राधाकृष्ण रतीने वियोगयुक्त शृंगाराचे वर्णन जसे काव्यात आणले तसेच मुग्ध आणि उत्तान शृंगाराचेही आणले. परंतु भक्तकवी हा 'त्या' तऱ्हेच्या बेहोशीत रंगलेला क्वचित आढळला तरी त्याचा भक्तिभाव हा तेथही झाकळलेला नसतो. त्याच्या मनातील भक्तीची आतुरता, व्याकुळता ही प्रेयसीच्या प्रतिमेतून रूपकभावाने प्रकट होते व ती आकुळ–व्याकुळ भावना जिवंत व ज्वलंत असल्यामुळे कोठल्याही प्रतिमेतून, प्रतीकातून, संकेतातून वा रूपकातून तेवढ्याच प्रभावीपणे व्यक्त झाल्यावाचून राहात नाही. मुमुक्षू जीवांच्या आंतरिक वेदना या काव्यातून उत्कटपणे व्यक्त होतात.

'विराण्या' या साहित्यप्रकाराचे स्वरूप आणि मराठीतील त्यांचा आविष्कार हा असा आहे.

## *2. एकनाथांच्या विराण्यांतील आशयविश्व आणि काव्यसौंदर्य :–*

### *2.1 प्रास्ताविक :–*

पैठणचे श्रीसंत एकनाथ हे एक थोर कृष्णभक्त होऊन गेले. अभंग गौळणी, विराण्या, भागवतातील कथा इत्यादींवर त्यांची विपुल रचना आहे. 'भारूड' हा वाङ्मयप्रकार त्यांनी लोकप्रिय केला. एकनाथांच्या गवळणी व विराण्या विख्यात आहेत. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात पराकोटीची अनावस्था माजून राहिली असताना नाथांनी ज्ञानेश्वरीचे संशोधन केले व भागवतधर्माच्या प्रचाराचा प्रारंभ केला. ज्ञानेश्वरी व नाथ भागवत या दोन ग्रंथाच्या आधारावर महाराष्ट्रातील भक्तिपंथ उभा राहिला आहे.

भक्ती ही मुळात प्रेममय असतेच. पण प्रेमभक्ती म्हणून एक विशेष प्रकार साधुसंत वर्णन करीत असतात. परमेश्वराविषयी निरंतर प्रेमच मनात ठेवून त्याच्याशी नाते जोडणे ही प्रेमभक्तीतील प्रारंभीची अवस्था असून शेवटी त्याच्या स्वरूपात प्रेममय मार्गानेच विलीन होणे, ही या प्रेमभक्तीची परम अवस्था मानली जाते. एकनाथांनी या प्रेममार्गाचा पुरस्कार अनेक ठिकाणी केलेला आहे. प्रासादिक भाषा, वाणीतील आध्यात्मिक तेज आणि अलौकिक प्रतिभाशक्ती यांच्या जोरावर एकनाथांनी समाजास भक्तितत्वाची ओळख फारच सुलभ पध्दतीने करून दिली आहे.

एकनाथांच्या विरहिण्या तिचे जन्मजन्मांतरीचे दुःख कसे नाहीसे झाले याचे वर्णन करतात. या परमेश्वराचे वर्णन करताना त्याच्या चारही वाणी मूक होतात. परमेश्वरप्राप्तीचा आनंद आपल्याला केवळ संतकृपेने लाभले असे ते परोपरीने सांगतात.

संत एकनाथ हे स्वतः एक लोकशिक्षक समजले जातात. तसेच ते त्यांच्या गुरुभक्तीसाठीही प्रसिध्द आहेत. 'एका जनार्दन' या नाममुद्रेतून त्यांची गुरुभक्ती व्यक्त होते. प्रपंच आणि परमार्थाचा समतोल साधणारे एक संयत, प्रगल्भ व्यक्तिमत्व एकनाथांच्या या विराण्यांमधून व्यक्त होते. पारंपरिक संकेतांच्या आधारानेच हे संतकवी एक अत्यंत मोहक भावविश्व आपणापुढे प्रकट करतात. एकनाथांचे हे भावविश्व असेच रसिक मनाला लोभावणारे आहे.

### 2) विरहिण्यांमधील भावावस्था :–

एकनाथांच्या विरहिणींमधून परमेश्वराच्या विरहामुळे येणारी आर्तता आणि परमेश्वराच्या भेटीनंतर येणारा ब्रह्मानंदाचा अनुभव यांचे वर्णन येते. एकनाथांच्या विराण्यांमधून विरहिणी आणि कृष्ण यांच्याबरोबरच संतमाहात्म्यांचे वर्णनही अनेक ठिकाणी येते. हा भवसागर यशस्वीपणे पार करून जायचे तर संतांच्या कृपेशिवाय ते शक्य नाही असा एकनाथांचा अभिप्राय आहे.

नाथांची विरहिणी त्या समचरण श्रीरंगाचेच ध्यान करीत आहे. त्यांचीच तिला अनिवार ओढ आहे. त्याचे वर्णन करताना तिच्या चारही वाणी मूक होतात. काया, वाचा, मने करून आपण सतत कृष्णाचा ध्यास घ्यावा आणि कोणत्याही कारणाने त्यात खंड पडू नये अशी तिची इच्छा आहे. श्रीकृष्णाच्या भेटीने त्यांचे जन्मजन्मांतरीचे दुःख नाहीसे होते. आनंदाच्या तुषारात ती न्हाऊन निघते. श्रीकृष्णाचा विरह घडलाच तर तो आपला अपराध नाही. हा सर्व तुझाच खेळ आहे, असेही त्या कृष्णाला बजावतात. त्याचे विरहाचे दुःख संपवून या संसाराच्या जंजाळातून बाहेर पडायचे तर संतांच्या मार्गदर्शनाशिवाय ते शक्य नाही. हे ओळखून ती अनन्यभावाने संतांना शरण जाते.

### 3) कृष्णवर्णन :–

त्या सावळ्याा घनश्यामाचे वर्णन करताना सर्वच संतकवींच्या शब्दकलेला पूर येतो. त्याचे किती आणि कसे वर्णन करू असे त्यांना होऊन जाते. संत एकनाथ ही याला अपवाद नाहीत. त्यांचा श्रीकृष्ण ‘समचरण’ आहे. सर्व गोपींना वेडे करणाऱ्या या सावळ्याा गोपीनाथाचे रूप शुभ्र चांदण्यात सावळा घन खेळावा तसे आहे. हा विरहिणींना वेध लावतो आणि स्वतः मात्र कुठे पसार होतो. गोपींना असे फसवून त्यांची आर्तता अनुभविण्यात त्याला फार आनंद वाटतो. गोपींना विरहाचे दुःख देणे आणि मिलनपूर्तीचा आनंद देणे हे दोन्हीही त्याचे खेळच आहेत. याच्या भेटीने या संसाराच्या मायापाशातून मुक्त होता येते, जगाचे फसवे रूप समजते, संसारविषयक भ्रांती नाहीशी होते आणि जन्मजन्मांतराचे दुःख संपून शाश्वत सुखाचा लाभ होतो.

### 4) गुरुमहिमा :–

एकनाथांच्या मते हा भवसागर यशस्वीपणे पार करायचा असेल तर गुरुकृपेशिवास दुसरा मार्ग नाही. तसेच पुण्य गाठीशी असल्याशिवाय संतसहवास घडत नाही. म्हणूनच एकनाथ मोठ्याा कृतार्थतेने म्हणतात –

“संतसंग घडला धन्य आजी ।
मोह ममता तुटली माझी ।।”

खऱ्या ज्ञानाची प्राप्ती होऊन परमेश्वरप्राप्ती हवी असेल तर अनन्यभावाने संतांना शरण जायला हवे हे ओळखून ही विरहिणी म्हणते –

‘यासी शरण गेलीयावाचुंनी । संतसंग न जोडे त्रिभुवनी’

संतांची कृपा होणे म्हणजे माहेर लाभल्यासारखा आनंद आहे असे या विरहिणीला वाटते. या गुरुकृपेने हा उसळणारा भवसागरही शांत होतो, मग मनाला शांतता लाभेल यात नवल काय?

या सर्वच विरहिण्यांमधून श्रीकृष्णाच्या भेटीसाठी युगानुयुगे तळमळणाऱ्या विरहिणीला गुरुकृपेमुळे आत्मानुभव येऊन शाश्वत आनंदाचा लाभ कसा झाला याचे वेधक वर्णन येते. एकनाथांच्या काव्यशैलीने ते रुचिर झाले आहे.

### 5) एकनाथांची काव्यशैली :–

एकनाथांची भाषा प्रासादिक, साधी व सरळ आहे.

दुःख फिटले सुख झाले थोर
हर्षे आनंदे आनंद तुषार

यांसारख्या सुंदर कल्पना अभंगातून सहजपणे येतात. भवसागर, भ्रांती, पश्यंती मध्यना, मरुनी, वैखरी यांसारखे पारमार्थिक क्षेत्रातील शब्द वारंवार येत असले तरी काव्य क्लिष्ट होत नाही.

### संदर्भ :–

०१. डॉ. मोहिते शिवाजीराव, ‘वारकरी संप्रदाय आणि संत साहित्य’, कर्मवीर प्रकाशन, पुणे.
०२.जोशी मधुकर रामदास, ‘सिध्द परंपरा आणि महाराष्ट्रातील संत’, विजय प्रकाशन, नागपूर.
०३.डॉ. गिंडे वा. पु., ‘कल्लोळ अमृताचे’, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ३०.
०४.कुलकर्णी व. दि., “ज्ञानेश्वरांचे काव्यशास्त्र”, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, मार्च १९९३.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org